# धर्मप्रांतीय उपासना आयोग, वसई

## प्रायश्चित्त काळातील पाचवा रविवार

## २१ मार्च २०२१

## श्रद्धावंतांच्या प्रार्थना

धर्मगुरू ः माझ्या बंधुभगिनीनो, आपण पापी असतानाही देवपित्याने आपल्या परम प्रेमाखातर आपल्या एकुलत्या एक पुत्राला आपला न्याय करण्यासाठी नव्हे तर आपले तारण करण्यासाठी या जगात पाठविले. ह्या प्रेमळ पित्याला धन्यवाद देऊन ख्रिस्तासह एकनिष्ठेने आपण त्याच्याकडे प्रार्थना करू या.

प्रतिसाद ः **प्रभो, आमची प्रार्थना ऐक.**

१. आपले पोप फ्रान्सिस, आर्चबिशप फेलिक्स, धर्मगुरू व व्रतस्थ ह्यांनी प्रभूच्या दुःखसहनाद्वारे भाविकांना शाश्वत जीवनाच्या मार्गावर चालण्यासाठी मार्गदर्शन करावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

२. मेल्याशिवाय पुनरूत्थान नाही म्हणजेच आत्मत्यागाशिवाय प्रतिफळ नाही. ख्रिस्ताच्या पुनरूत्थानाचे सहभागीदार होण्यासाठी त्याच्या आत्मत्यागाचा, प्रीतीचा, शांतीचा व क्षमेचा संदेश आपल्याला आचरणात आणता यावा म्हणून आपण प्रार्थना करू या.

३. गव्हाचा दाणा जमिनीत पडून मेला तरच तो शंभर पट पिक देतो. मानवी जीवनात कष्ट करून यश मिळविण्याची सुबुद्धी आपल्याला मिळावी म्हणून आपण प्रार्थना करू या.

४. आपल्या जीवनात येणा-या दुःखाला व संकटाला सामोरे जाऊन आपण ख्रिस्ताच्या दुःखसहनात सहभागी होत असतो. प्रभूच्या दुःखसहनाशी एकरूप होऊन त्याच्या पुनरूत्थानाचे वैभव मिळविण्यास आपणास कृपा मिळावी म्हणून आपण प्रार्थना करू या.

५. प्रभूच्या सामर्थ्यशाली कृपेचा स्पर्श गरीब, आजारी, निराश्रित व निराधार लोकांना घडावा व कोरोना विषाणूपासून तसेच सर्व प्रकारच्या नैसर्गिक आपत्तीपासून आपले रक्षण व्हावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

थोडावेळ शांत राहून आपण आपल्या वैयक्तिक हेतूंसाठी प्रार्थना करू या.

धर्मगुरू ः हे प्रभो, तुझे लोक पुन्हा तुझ्याकडे येवोत आणि संपूर्ण अंतःकरणाने ते तुझी सेवा करोत. श्रद्धेने आम्ही तुझ्याकडे साहाय्याची याचना केली आहे. आमच्या जीवनात तुझ्या दयेची आणि प्रेमाची जाणीव करून दे. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभू ख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.